दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र | गुरुवार, 13 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 96 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN NO. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# परळी रेल्वे स्थानकात RPF कर्मचाऱ्याला प्रवाशांनी दिला चोप !



## प्लॅटफॉर्मवरच झटापट, व्हायरल व्हिडिओनंतर तातडीने निलंबन

■ परळी | प्रतिनिधी :

परळी रेल्वे स्थानकावर ११ ऑगस्टच्या रात्री रेल्वे सुरक्षा बलाच्या (RPF) कर्मचाऱ्यावर प्रवाशांशी गैरवर्तन, शिवीगाळ, मारहाण तसेच महिलेशी छेडछाड केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने कारवाई करत संबंधित कर्मचाऱ्याला निलंबित केल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे ११ वाजेपासून मध्यरात्रीपर्यंत परळी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्मवर हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. संबंधित RPF कर्मचारी सुनील कुमार याच्यावर मद्यधुंद अवस्थेत प्रवाशांशी वाद घालणे, शिवीगाळ करणे आणि मारहाण केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. तसेच एका महिलेशी गैरवर्तन केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

> व्हायरल व्हिडिओत मारहाणीत दिसत असणारा रेल्वे सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्यास तात्काळ निलंबित केले असून सदर प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी एक कमिटी ही नेमण्यात आली आहे.
>
> **- संजय कांबळे ,**
> पोलीस निरीक्षक (आर पी एफ)
> परळी रेल्वे स्टेशन

या प्रकारानंतर संतप्त प्रवाशांनी संबंधित कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची माहिती आहे. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये एका महिलेकडून संबंधित कर्मचाऱ्याला मारहाण होताना, तसेच RPF कर्मचारी हातातील काठीने समोरील व्यक्तींवर प्रहार करताना दिसत असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, घटनेची गंभीर दखल घेत सिकंदराबाद येथील RPF वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यावर तातडीने निलंबनाची कारवाई केली आहे. RPF परळी रेल्वे स्थानकाचे पोलीस निरीक्षक संजय कांबळे यांनी माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, या संपूर्ण प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी समिती नेमण्यात आली आहे.

घटनेच्या पार्श्वभूमीवर स्थानकातील CCTV फुटेज तपासणे, संबंधित कर्मचाऱ्याची वैद्यकीय तपासणी करणे आणि चौकशीत दोष आढळल्यास पुढील कठोर कारवाई करणे अपेक्षित आहे. तसेच घटनेच्या वेळी रेल्वे पोलिसांची भूमिका काय होती, याचीही चौकशी करण्याची मागणी प्रवासी आणि नागरिकांकडून होत आहे. व्हायरल व्हिडिओ, गंभीर आरोप आणि त्यानंतर झालेले निलंबन यामुळे परळी रेल्वे स्थानकातील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. आता चौकशी समितीच्या अहवालातून या घटनेचे नेमके सत्य काय समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





# दीप अमावस्येनिमित्त श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ येथे लाखो भक्तांचा जनसागर भक्तांच्या सेवेत आ .सुरेश धस ; व्यवस्थेवर स्वत : ठेवले लक्ष

### ‘बडे बाबा की जय, नमो आदेश’च्या जयघोषाने मच्छिंद्रनाथ नगरी दुमदुमली.

■ **आष्टी (प्रतिनिधी)**

दीप अमावस्येच्या पावन पर्वानिमित्त बुधवारी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ येथे लाखो भाविकांच्या श्रद्धेचा महासागर उसळला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक बडे बाबांच्या दर्शनासाठी मच्छिंद्रनाथांच्या पावन भूमीत दाखल झाले. पहाटेपासूनच मंदिर परिसर भक्तांनी फुलून गेला होता.भाविक हेच बडे बाबांचे मानकरी; त्यांच्या दर्शनात कोणतीही अडचण येता कामा नये,’ या भावनेतून आ. सुरेश धस यांनी स्वतः मैदानात उतरून व्यवस्थेवर लक्ष दिल्याने भाविकांमध्येही समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

दीप अमावस्येच्या निमित्ताने बुधवारी बडे बाबांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी भल्या पहाटेपासूनच मंदिराकडे गर्दी करण्यास सुरुवात केली. जसजसा दिवस उजाडत गेला तसतशी भाविकांची संख्या वाढत गेली. मंदिर परिसरात दर्शनबारीसाठी भक्तांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अनेक भाविकांनी शिस्तबद्धपणे दर्शनबारीत उभे राहून बडे बाबांचे दर्शन घेतले.

> **भक्तांच्या सेवेत आ.सुरेश धस ; व्यवस्थेवर स्वतः ठेवले लक्ष**
>
> **■ दीप अमावस्येनिमित्त श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ येथे लाखो भाविकांची गर्दी झाल्याने दर्शन व्यवस्था आणि वाहतूक नियोजनाचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. मात्र, गडाचे विश्वस्त आमदार सुरेश धस स्वतः संपूर्ण व्यवस्थेवर लक्ष ठेवून होते. भाविकांना बडे बाबांच्या दर्शनासाठी कोणतीही अडचण येऊ नये, दर्शनबारी सुरळीत राहावी आणि प्रत्येक भक्ताला सुलभपणे दर्शन घेता यावे, यासाठी त्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून व्यवस्थेची पाहणी केली. दुसरीकडे, भाविकांच्या वाहनांची मोठी गर्दी झाल्याने वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये, यासाठीही आमदार धस यांनी संबंधित यंत्रणेशी समन्वय साधत वाहनांची ये-जा सुरळीत ठेवण्याच्या सूचना दिल्या. यावेळी त्यांनी दर्शनासाठी आलेल्या भाविकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.**

दूरवरून आलेल्या भाविकांच्या वाहनांमुळे परिसरातील प्रमुख मार्गांवर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. काही ठिकाणी वाहनांची मोठी गर्दी झाल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन व स्वयंसेवकांकडून नियोजन करण्यात आले. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी विविध ठिकाणी आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती.

मंदिराच्या परिसरात सकाळपासूनच भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ‘बडे बाबा की जय’, ‘नमो आदेश’ अशा जयघोषाने संपूर्ण मच्छिंद्रनाथ नगरी दुमदुमून गेली. हातात पूजेचे साहित्य, डोक्यावर श्रद्धेची ओढ आणि मनात बडे बाबांच्या दर्शनाची आस घेऊन आलेल्या भाविकांच्या चेहऱ्यावर भक्तिभाव स्पष्टपणे दिसून येत होता. दीप अमावस्येच्या पवित्र दिवशी बडे बाबांचे दर्शन घेऊन त्यांच्या चरणी माथा टेकवावा आणि जीवनात सुख, समाधान, आरोग्य व समृद्धी लाभावी, अशी भावना घेऊन भाविक मोठ्या संख्येने येथे दाखल झाले. दर्शनानंतर भाविकांनी मंदिर परिसरात दीप प्रज्वलित करून भक्तिभावाने पूजा-अर्चना केली. विशेष म्हणजे, केवळ स्थानिकच नव्हे तर महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांसह देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांच्या उपस्थितीमुळे यंदाची दीप अमावस्या विशेष भक्तिमय ठरली. श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा अद्भुत संगम आज श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ येथे अनुभवायला मिळाला.

पहाटेपासून सुरू झालेला भक्तांचा ओघ दिवसभर कायम राहिल्याने मच्छिंद्रनाथ नगरीला जणू यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. लाखो भाविकांच्या उपस्थितीत ‘बडे बाबा की जय... नमो आदेश!’ या जयघोषाने परिसर भारावून गेला.





# सासवडच्या वाघीरे विद्यालयाचे सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

■ **सासवड (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे दि. २६एप्रिल २०२६रोजी इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षा राज्यात आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेचा दि. २५जुलै २०२६रोजी जाहीर झाला असून इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत सासवड येथील वाघीरे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील विद्यालयातील एकूण २५ विद्यार्थी पात्र झाले असून ६ विद्यार्थ्यांना २००पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. गुणवत्ता यादीत ४ विद्यार्थी झळकले आहेत. शेट्टी सिद्धी(मिळालेले गुण२४४), हिप्परकर कार्तिक (२३४), कुंजीर वेदांत (२२६), निरगुडे तनिष्क (२२४) व तोडकर शुभंकर (२१०) जांभळे ओम (२०६)हे सहा विद्यार्थी पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत आले असून एकूण चार विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन, मुख्याध्यापकांचे नियोजन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरल्याचे विद्यालयाचे शिक्षिका घोलप यांनी सांगितले. चाचण्यांचे नियमित आयोजन करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि यशाचा आलेख उंचावत असल्याचेही त्यांनी सांगितले.

शाळेत राबविण्यात येणारे विशेष मार्गदर्शन आणि शिक्षकांच्या अथक परिश्रमांमुळेच हे यश मिळाल्याचे विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल शाला समिती अध्यक्ष राहुल मिरासदार, महामात्र सुधीर भोसले, मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, उपमुख्याध्यापक शंतनू सुरवसे, पर्यवेक्षिका अर्चना लडकत यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. या विद्यार्थांना इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यालयातील शिक्षिका घोलप, सहारे, सावंत, केंगले, जगताप यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# प्रियंका लाठींच्या रूपाने केरबा खोरे यांना माऊलीची भेट

## वारीत सापडलेल्या वारकऱ्यासाठी देवदूत बनलेल्या प्रियंका लाठी या तरुण पत्रकाराला सोशल मीडियावर सलाम

वडवणी : प्रतिनिधी

आळंदी ते पंढरपूर वारीचे कव्हरेज करताना न्यूज18 मराठीच्या तरुण पत्रकार प्रियंका लाठी यांना शेतात बसलेले 75 वर्षीय केरबा बाबुराव खोरे हे वारकरी दिसले. News18 चा माईक हातात घेऊन घेतलेली ती सहज मुलाखत संपूर्ण महाराष्ट्राचे काळीज हलवून गेली.

### वारीत चालता-चालता झाली भेट, आणि बदललं एक आयुष्य

आळंदी ते पंढरपूर वारीदरम्यान न्यूज18 मराठीच्या पत्रकार प्रियंका लाठी चालत-चालतच कव्हरेज घेत होत्या. वारकरी, भजन, टाळ-मृदुंग यांचं चित्रीकरण करत असतानाच त्यांची गाठ 75 वर्षीय केरबा बाळूराव खोरे यांच्याशी पडली. शेताच्या बांधावर हताश होऊन बसलेल्या केरबा बाबांची सहज मुलाखत घ्यावी म्हणून प्रियंका त्यांच्याजवळ गेल्या. News18 चा माईक समोर करीत अगदी आस्थेने विचारपूस केली. केरबा बाबांनी आपली व्यथा सांगायला सुरुवात केली. "माऊली सुखी ठेवते... माऊलीवरच भरोसा आहे" असे म्हणत त्यांनी सांगितले की पत्नी आणि दोन मुलांचा मृत्यू झाला आहे. नातेवाईकांनी कर्जाच्या नावाखाली त्यांची जमीन हडप केली आहे. घरात आता कोणीच नाही. एकटेच आयुष्य काढत आहेत. केरबा बाबांच्या डोळ्यातलं पाणी आणि त्यांचा तो स्वाभिमान पाहून प्रियंका लाठी भावनिक झाल्या. हीच मुलाखत जेव्हा न्यूज18 वर प्रसारित झाली तेव्हा केरबा बाबांचे दुःख संपूर्ण महाराष्ट्राने ऐकले. व्हिडिओ व्हायरल झाला. "पत्नी, दोन मुलं गेली. जमीन नातेवाईकांनी हडपली. घरात आता कोणी नाही. पण माऊली सुखी ठेवते, माऊलीवरच भरोसा आहे" - हे ऐकून पाहणाऱ्यांच्याही डोळ्यात पाणी आले. महाराष्ट्र हळहळला. सोशल मीडियावर हजारो लोकांनी केरबा बाबांना मदत करण्याची भावना व्यक्त केली. "प्रियंका लाठींच्या रूपाने विठ्ठलच भेटला" अशा कमेंट्सचा पाऊस पडला. यानंतर प्रियंका लाठी यांनी वारी संपल्यावर केरबा बाबांचे तांदळी येथील घर गाठले.

### महिलांचा लळा, मारली मिठी

गावात गेलेल्या प्रियंका लाठींना महिलांनी अक्षरशः मिठी मारली. 'आमच्या बाबांना तुम्हीच देव पाठवला' अशा भावना व्यक्त केल्या. पोळ्या लाटण्यापासून वारकऱ्यांशी गप्पा मारण्यापर्यंत प्रियंका प्रत्येकात एकरूप झाल्या होत्या.



### हजारो कमेंट्स, एकच भावना : "विठ्ठल भेटला"

ही मुलाखत प्रसारित होताच सोशल मीडियावर हजारो कमेंट्सचा पाऊस पडला. अनेकांनी लिहिले - "प्रियंका लाठी यांच्या रूपाने केरबा बाबांना थेट विठ्ठलच भेटला". वारीत विठ्ठल शोधणाऱ्या वारकऱ्याला पत्रकारितेच्या माध्यमातून माणुसकीच्या रूपात विठ्ठल भेटल्याच्या भावना लोकांनी व्यक्त केल्या.

### वारीनंतर गावात गेल्या, घरात उजेड आला

वारी संपल्यावर प्रियंका लाठी यांनी शिरूर तालुक्यातील तांदळी येथील केरबा खोरे यांचे घर गाठले. गुलाबी भिंतीच्या त्या घरात अंधार होता. त्यांच्या पाठपुराव्यानंतर आमदार माऊली कटके आणि तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी दखल घेतली. जमिनीचा ताबा, PM-किसानचा लाभ आणि घरात वीज जोडणी झाली. आज केरबा खोरे यांच्या घरात खऱ्या अर्थाने उजेड आहे.







### दिवे लावण्याचा संदेश

प्रियंका लाठी म्हणाल्या - "जर मला कोणी विचारले की तू जीवनात काय दिवे लावले, तर..." सोबत केरबा खोरे यांच्या घरात लागलेल्या "अंधकारमय खोलीत दिवे लावा. अंधकारमय जीवनात प्रकाश निर्माण करा" - हा त्यांचा संदेश आज प्रेरणा बनला आहे.

### आई-वडिलांचा अभिमान

प्रियंका लाठी यांच्या या कार्याचा त्यांच्या आई-वडिलांनाही खूप अभिमान आहे. ते स्वतः सांप्रदायिक आहेत. मुलीने केलेले काम पाहून त्यांनी व्हिडिओ कॉलद्वारे केरबा खोरे यांच्याशी देखील संवाद साधला. "आमच्या मुलीने माणुसकीचा धर्म पाळला" असे सांगत त्यांनी प्रियंका यांना आशीर्वाद दिला.

### पत्रकारिता म्हणजे काय

"पैशापेक्षा प्रेम, आपुलकी आणि सहवास मोठा असतो. वयोवृद्धांच्या हातून काम काढून घेऊ नये. आपण स्वावलंबी आहोत हा अभिमान त्यांना जगवतो." केरबा खोरे यांच्या भेटीतून मिळालेला हा संदेश प्रियंका लाठी यांनी संपूर्ण महाराष्ट्रापर्यंत पोहोचवला.

### "ताई तुम्ही विठ्ठल आहात"

"अशा पत्रकारांचीच आज गरज आहे" "वारीत पांडुरंग भेटतो म्हणतात, आज प्रियंका ताईंच्या रूपात भेटला" अशा हजारो कमेंट्सनी सोशल मीडिया भरून गेला आहे. लोकांनी प्रियंका लाठी यांच्या संवेदनशील पत्रकारितेला डोक्यावर घेतले आहे. एक मुलाखत, एक तरुण पत्रकार आणि एक आयुष्य उजळले. वारीच्या गर्दीत सापडलेल्या केरबा खोरे यांच्या चेहऱ्यावर आज हसू आहे. प्रियंका लाठी आणि न्यूज18 मराठीच्या या सोज्वळ पत्रकारितेला सलाम!


दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# फार्मर आयडीचा घोळ! तलाठी-तहसील कार्यालयांचे उंबरठे झिजवून बळीराजा मेटाकुटीस

## सर्व्हर डाऊन व तांत्रिक अडचणी; शेतीची कामे बाजूला सारून कार्यालयात फेऱ्या

सिरसाळा /अतुल बडे

शासकीय योजनांचा लाभ पारदर्शक पद्धतीने मिळण्यासाठी आणि डिजिटल सातबारासोबत संलग्न करण्यासाठी काढण्यात येत असलेला 'फार्मर आयडी' (Farmer ID) सध्या सिरसाळा परिसरातील शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे. या आयडीच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या तांत्रिक आणि कागदपत्रांच्या गोंधळांमुळे शेतकरी मेटाकुटीस आले असून, दुरूस्तीसाठी तलाठी आणि तहसील कार्यालयाच्या चकरा मारून शेतकरी पूर्णपणे बेजार झाले आहेत.आधार कार्ड, बँक खाते आणि सातबारावरील नावांमध्ये तफावत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार होण्यात अडचणी येत आहेत.महा-अग्री किंवा संबंधित पोर्टल वारंवार डाऊन होत असल्याने




नोंदणी करताना मोठा वेळ वाया जात आहे. कृषी विभाग, महसूल विभाग आणि आपले सरकार सेवा केंद्र यांच्यामध्ये योग्य समन्वय नसल्याचा भुर्दंड शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे.सध्या खरीप हंगामातील मशागत, पेरण्या आणि पिकांची देखभाल करण्याची महत्त्वाची कामे अंतिम टप्प्यात असताना, शेतकऱ्यांना शेतात राबायचे सोडून शासकीय कार्यालयांच्या दारात रांगा लावाव्या लागत आहेत. तासन्तास उभे राहूनही काम होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

> **"एका बाजूला शासनाकडून सर्व कामे ऑनलाईन व सुटसुटीत केल्याचा दावा केला जात आहे, मात्र प्रत्यक्षात फार्मर आयडी काढताना आमची अक्षरश दमछाक होत आहे. साधी दुरुस्ती करण्यासाठीही अधिकारी टाळाटाळ करत आहेत."**
> **— संतप्त शेतकरी, सिरसाळा**

### प्रशासन लक्ष देणार का?

**शेतकऱ्यांच्या या वाढत्या अडचणी लक्षात घेता, जिल्हा प्रशासन आणि तालुका प्रशासनाने तातडीने या प्रकरणाची दखल घेणे गरजेचे बनले आहे. विशेष शिबिरे आयोजित करून किंवा तलाठी स्तरावरच या तांत्रिक त्रुटी तात्काळ दूर करण्याची मागणी सिरसाळा परिसरातील शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. आता प्रशासन याकडे गांभीर्याने पाहत कधी लक्ष देणार आणि बळीराजाला दिलासा मिळणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.**

# घरातील ध्वनी प्रदूषणाकडे लक्ष देण्याची गरज - देवेंद्र भुजबळ

आपल्या घरात मिक्सर, वॉशिंग मशिन, व्हॅक्युम क्लिनर आदी उपकरणांच्या कर्कश्श आवाजामुळे जे ध्वनी प्रदूषण होत असते, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन निवृत्त माहिती संचालक श्री देवेंद्र भुजबळ यांनी केले. ते पुणे येथील निसर्गसेवक संस्थेने नुकत्याच आयोजित केलेल्या "कर्णकर्कश आवाज - कायदा- आरोग्य आणि आपण" या विषयावरच्या चर्चा सत्रात भाग घेताना बोलत होते.



देवेंद्र भुजबळ यांनी जेष्ठ श्रवणतज्ज्ञ डॉ. कल्याणी मांडके, पर्यावरण विषयातील कायदेतज्ज्ञ अमोघ परळीकर, आणि प्रा. महेश शिंदीकर यांनी व्यक्त केलेली मते , अनुभव हे धार्मिक सण समारंभ, शुभ कार्ये या दरम्यान होणारे ध्वनि प्रदूषण, नवीन इमारतींच्या बांधकामामुळे होणारे प्रदूषण या पुरतेच मर्यादित असल्याचे निदर्शनास आणून देऊन देवेंद्र भुजबळ यांनी घराबाहेरील प्रदूषण हे प्रासंगिक असते तर घरातील उपकरणांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण हे सातत्याने होत असल्यामुळे त्याचा घरातील व्यक्तींवर काय दुष्परिणाम होतो, तो कसा रोखता येईल, याचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

भुजबळ यांच्या मताशी सहमती दर्शवित एका गृहिणीने मिक्सर वापरताना, त्याच्या आवाजाचा किती त्रास होतो ते सांगितले. तर दुसर्या एका व्यक्तीने एक प्रसिद्ध प्रवचनकार घरातील पंख्याच्या आवाजामुळे झोपू शकत नसल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, झोपताना गाणी लावून ती ऐकत झोपतात,असे सांगितले. तर आणखी एका व्यक्तीने आजकालची मुले, मुली सारखा हेड फोन लावून मोबाईल वरील गाणी, कार्यक्रम ऐकत असल्यामुळे त्यांना तरुण वयात होऊ लागलेल्या त्रासाकडे लक्ष वेधले.

चर्चासत्राचे प्रास्ताविक निसर्गसेवक संस्थेचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केले. तर चर्चासत्राचे संचालन माधवी दाबक यांनी केले. या चर्चासत्रास विविध क्षेत्रातील मान्यवर, पर्यावरण चळवळीतील कार्यकर्ते, संस्थेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुंडेश्वराच्या पावन भूमीत १३ ऑगस्टपासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी-योगसंग्राम पारायण सोहळा

**आष्टी | प्रतिनिधी**

सद्गुरू संत शेख महमंद महाराजांच्या पावन भूमी पुंडी, ता. आष्टी, जि. बीड येथे सालाबादप्रमाणे वर्ष १५ वे अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी व योगसंग्राम पारायण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे.

श्रावण शुद्ध १ शके १९४८गुरुवार दि. १३/०८/ २०२६ ते श्रावण शुद्ध ८ गुरुवार दि. २०/०८/२०२६ या कालावधीत हा सोहळा गुणवान विद्वान मंडळींच्या उपस्थितीत होणार आहे.

आष्टी तालुक्यातील पुंडी येथे समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या वतीने सलग १५ व्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताह तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी व योगसंग्राम पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार (ता. १३) पासून या अध्यात्मिक सोहळ्याला सुरुवात होणार असून, २० ऑगस्ट रोजी काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल.

श्रावण महिन्याचे औचित्य साधून पुंडीत दरवर्षीप्रमाणे या सप्ताहाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. ह.भ.प. निवृत्ती महाराज बोडखे, ह.भ.प. राऊतदादा महाराज (पिंपळा) आणि ह.भ.प. रामदास महाराज रकटाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडत आहे. सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी १० ते दुपारी १२ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ३ ते ५ योगसंग्राम पारायण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ७ ते ९ या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा व त्यानंतर दररोज महाप्रसाद व जागर पार पडणार आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाचा व पारायण सोहळ्याचा पंचक्रोशीतील जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पुंडी येथील समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### दिग्गज कीर्तनकारांची हजेरी

या सप्ताहात गुरुवार (ता. १३) रोजी ह.भ.प. अर्जुन महाराज मोटे यांच्या कीर्तनाने सप्ताहाची सुरुवात होईल. त्यानंतर अनुक्रमे ह.भ.प. कविराज महाराज झावरे (१४ ऑगस्ट), ह.भ.प. नरेंद्र महाराज गुरव (१५ ऑगस्ट), ह.भ.प. बबन महाराज बहीरवाल (१६ ऑगस्ट), ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर (१७ ऑगस्ट), ह.भ.प. उद्धव महाराज चोले (१८ ऑगस्ट) आणि ह.भ.प. राजेश महाराज पाटील (१९ ऑगस्ट) यांची सुश्राव्य कीर्तन सेवा रुजू होणार आहे.

गुरुवार, ता. २० ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कदम (छोटे माऊली, आळंदी देवाची ) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. गुरुवार, ता. २० ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली कदम (छोटे माऊली) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. या सोहळ्यानिमित्त कै. मालतीबाई लक्ष्मण भालेराव यांच्या स्मरणार्थ श्री. रतन लक्ष्मण भालेराव यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# तालुका विधी सेवा समितीतर्फे १५ ऑगस्टला आष्टीत वॉकेथॉन; बालहक्कांबाबत होणार जनजागृती

## ध्वजारोहण समारंभानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत वॉकेथॉन रॅलीला होणार प्रारंभ

आष्टी | प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून बालकांचे हक्क, संरक्षण, शिक्षण आणि न्याय याबाबत जनजागृती करण्यासाठी तालुका विधी सेवा समिती, आष्टीच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी वॉकेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ध्वजारोहण समारंभानंतर दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, आष्टी येथून मान्यवरांच्या उपस्थितीत या वॉकेथॉन रॅलीला सुरुवात होणार आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, तालुका विधी सेवा समिती, आष्टी, वकील संघ आष्टी, तालुका पोलीस प्रशासन तसेच इंटरनॅशनल जस्टिस मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. दिनेश पी. सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली ही वॉकेथॉन रॅली आयोजित करण्यात आली आहे.

या रॅलीमध्ये विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, पोलीस अधिकारी तसेच प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. बालकांशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर जनजागृती करण्याचा या रॅलीचा मुख्य उद्देश आहे.

**■ विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे**

तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्ष श्रीमती अलका बी. निवारे यांनी आष्टी तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या वॉकेथॉन रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सहभागातून बालहक्कांबाबतचा जनजागृतीचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

'प्रत्येक बालकाला स्वातंत्र्य, शिक्षण, संरक्षण आणि न्याय मिळाला पाहिजे' या विचाराला केंद्रस्थानी ठेवून ही रॅली काढण्यात येणार आहे. बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांच्या संरक्षणासाठी समाजाने एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या वॉकेथॉनमधून बालकांच्या हक्कांबाबत जनजागृती करण्यासोबतच कायदेविषयक जागरूकता निर्माण होणार असून, आष्टी शहर व तालुक्यातील नागरिकांनीही या सामाजिक उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### बालमजुरी, बालविवाह रोखण्याबाबत जनजागृती

वॉकेथॉनच्या माध्यमातून बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह निर्मूलन, बालकांचे संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी, लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण, प्रत्येक बालकाला न्यायाचा अधिकार तसेच प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार या विषयांवर नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. बालक हे देशाचे भवितव्य असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळणे आवश्यक आहे. बालकांवर होणारे विविध प्रकारचे अन्याय, अत्याचार, शोषण आणि त्यांच्या हक्कांचे उल्लंघन रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने जागरूक राहणे गरजेचे आहे. याच उद्देशाने वॉकेथॉनच्या माध्यमातून बालहक्कांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.



# जि.प. शाळा वाहिरा येथील शिक्षक बाबासाहेब बनसोडे यांची केंद्रप्रमुखपदी निवड; गावातून सत्कार

प्रतिनिधी | सोपान पगारे

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाहिरा येथील शिक्षक बाबासाहेब बनसोडे यांची केंद्रप्रमुख म्हणून निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण आहे. या निवडीबद्दल त्यांचा गावातील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.शिक्षण क्षेत्रात गेली अनेक वर्षे निष्ठेने सेवा देणाऱ्या बनसोडे सरांच्या कामाची दखल घेऊन त्यांना केंद्रप्रमुखपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, पालक आणि सहकारी शिक्षकांनी अभिनंदन केले. सत्कार समारंभात बोलताना मान्यवरांनी सांगितले की, "बनसोडे सर हे मेहनती आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील शाळांचा शैक्षणिक दर्जा नक्कीच उंचावेल."

यावेळी ग्रामस्थ, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पुष्पगुच्छ देऊन आणि शाल-श्रीफळ देऊन बनसोडे सरांचा सत्कार केला. नवनियुक्त केंद्रप्रमुख बाबासाहेब बनसोडे यांनी यावेळी सर्वांचे आभार मानले आणि "शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करू" अशी ग्वाही दिली.

# वाहिरा येथे संत सावता महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात संपन्न; सोमनाथ मेटे महाराजांचे रसाळ कीर्तन

**प्रतिनिधी - सोपान पगारे**

वाहिरा येथे संत सावता महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कीर्तन सोहळ्याला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या कीर्तनासाठी प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. सोमनाथ मेटे महाराज उपस्थित होते. मेटे महाराजांनी संत सावता महाराजांच्या जीवनचरित्रावर आणि कार्यावर अत्यंत रसाळ व बोधप्रद निरूपण केले. त्यांच्या कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कीर्तनाला गावातील सर्व टाळकरी व गायक ह भ प समाधान महाराज व ह भ प रेवन्नाथ महाराज मेटे यांनी उत्तम गायनाची साथ दिली. ह भ प मृदंगाचार्य सोपान महाराज यांनी उत्तम वादनाची साथ केली सहकाऱ्यांनी अतिशय सुंदर आणि गोड साथ दिली. टाळ, मृदुंग आणि भजनांच्या तालावर भाविक तल्लीन झाले.

कार्यक्रमासाठी बाहेरील व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळपासूनच परिसरात भाविकांची गर्दी दिसून येत होती. ७ ते ९ यावेळात महाप्रसादाचे आयोजन संजय शेलार यांनी केले होते करण्यात आले होते.

संत सावता महाराजांच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि कर्मयोगाच्या माध्यमातून सर्व संतांनी मनाची मशागत केलेली आहे उत्तम मनोभावाने सर्व समाजाने एकत्र येऊन संतांचे विचार जपण्याची गरज ह भ प सोमनाथ महाराज शेलार यांनी व्यक्त केली. संत वचनाचा प्रसार आणि प्रचार व्हावा यासाठी दरवर्षी अशा प्रकारचे धार्मिक कार्यक्रम व्हावेत, अशी भावना व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी श्री संत सावता माळी तरुण मंडळ व वाहिरा ग्रामस्थ यांनी भरपूर परिश्रम घेतले.



दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरुवार, 13 ऑगस्ट 2026
Last page

# आष्टी येथे श्री संत सावता महाराज व श्री संत नामदेव महाराज संयुक्त संजीवन समाधी सोहळा उत्साहात संपन्न

## जीवनात एका विषयात एकाग्रता असणारेच संत असतात : ह.भ.प.भानुदास महाराज शास्त्री

**आष्टी (प्रतिनिधी)**

देव आणि संत यांच्याशी कधीही खोटे वागू नये.संसार देवापेक्षा जास्त आवडू नये. व्यवस्था म्हणून संसार असावा. संत हे उच्च अधिकारी असतात.जीवनात एका विषयात एकाग्रता असणारेच संत असतात असे प्रतिपादन ह.भ.प.भानुदास महाराज शास्त्री यांनी केले. आष्टी येथील श्री संत सावता माळी मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनात बोलत यावेळी पुढे म्हणाले की,

आष्टी येथे 'श्री संत सावता महाराज व श्री संत नामदेव महाराज संयुक्त संजीवन समाधी सोहळा २०२६' निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक परायण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.





यावेळी ह.भ.प.भानुदास महाराज शास्त्री म्हणाले की, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा हा अत्यंत भावूक,आर्त आणि अध्यात्मिक अनुभूती देणारा विरहिणी अभंग आहे.या अभंगात भगवंताच्या विरहातील व्याकूळता आणि अद्वैत भक्तीचे अत्यंत सुंदर दर्शन घडते. माऊली भगवंताचे स्थान अत्यंत उच्च शब्दांत सांगत आहेत.ते म्हणतात, हे केशवा! तू माझ्या या शरीरातील जीवाचाही जीव आहेस. जीवात्म्यामागील परमात्मचे चैतन्य आहेस. आणि माझ्या मनात जे प्रेम आहे.त्या प्रेमाचाही तू मूळ भाव आहेस.माझे मन तुझ्यावर अशा प्रकारे जडले आहे की, तुझ्याशिवाय मला या जगातील अणुमात्र (कणभरसुद्धा) कोणतीही वस्तू किंवा गोष्ट आवडत नाही. संसारातील सर्व सुखदुःखे तूझ्या या विरहापुढे व्यर्थ वाटतात. जसे पाण्याशिवाय माशाचा जीव अस्वस्थ होतो, तसेच तुझ्याशिवाय माझे मन कुठेही जात नाही. भक्ताची आर्तता आणि विरहाची तगमग दिसून येते. भक्त किंवा सखी आपल्या सयेला उद्देशून म्हणते आहे की, मी माझ्या प्राणाने आणि मनाने त्या भगवंताला पूर्णपणे शरण गेले आहे.त्याचे स्मरण करत आहे; मग असा माझा प्राण असलेला विठ्ठल अजून माझ्या भेटीसाठी का येत नाही? हे सये, त्या माझ्या प्राणाधार असलेल्या पांडुरंगाला लवकारत माझ्याकडे घेऊन या, माझ्या विरहाची वेदना आता सहन होत नाही. येथे भक्ताचे अनन्य शरण जाणे आणि ईश्वराबद्दलची ओढ दिसून येते.

संत ज्ञानेश्वर महाराज आपल्या आराध्य दैवताचे रूप वर्णन करतात.ते म्हणतात की, आमचे भाग्य अत्यंत सुंदर आणि श्रेष्ठ आहे, कारण आम्हाला सर्व सौंदर्याचा सागर लाभला आहे. तो लावण्यसागर म्हणजे रखुमाईचा पती साक्षात श्रीविठ्ठल होय.माऊली आदराने व प्रेमाने विठ्ठलाला 'बाप' असे संबोधतात. ज्याच्या दर्शनाने जीवनातपरम आनंद आणि जीवनाचे सार्थक होते, तोच आमचा श्रीविठ्ठल आहे. गोपींचाकृष्णावरील असीम प्रेम आणि विरह जसा यामध्ये दिसतो,सर्वसामान्य भक्ताने ईश्वराशी जोडावे लागण आपल्या शरीरातील नश्वर देह वेगळा आणि त्यातील चैतन्य शक्ती वेगळी आहे.ज्याप्रमाणे आत्म्याला परमात्म्याशिवाय चैन पडत नाही, साधकाने आपल्या मूळ विठ्ठलाशी समरस झाले पाहिजे हा संदेश या अभंगातून दिला आहे.हा सोहळा रविवार दि.५ ते १२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत संपन्न झाला. या धार्मिक महोत्सवाचे आयोजन संत सावता सेवा मंडळ व ग्रामस्थ आष्टी यांच्या वतीने करण्यात आले होते.धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल महोत्सवांतर्गत सप्ताहात काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण,संत कथा, हरिपाठ,हरिकीर्तन आणि हरिजागर यांसारख्या विविध अध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. या अखंड हरिनाम सप्ताहाला ह.भ.प. आत्माराम गिरी महाराज (मांदळी) यांचे विशेष आशीर्वाद लाभले. तसेच, व्यासपीठ चालक म्हणून ह.भ.प. आसाराम महाराज डोमकावळे आणि मार्गदर्शक म्हणून ह.भ.प. रामदास डोरले नाना व ह.भ.प. बाळसाहेब महाराज झगडे यांनी काम पाहिले.सप्ताहादरम्यान दररोज नामांकित कीर्तनकारांची सेवा लाभली. ह.भ.प.पुण्याताई महाराज जगताप, डॉ.अमित महाराज डोके, ह.भ.प.सोनाजी महाराज बनकर,ह.भ.प.गणेश महाराज सुडके,ह.भ.प. शिवाजी महाराज कोकणे, सोमवारी सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवे यांचे संत नामदेव महाराज यांचे पुण्यकाळ कीर्तन व पुष्पवृष्टी झाली.मंगळवारी सूर्योदयाच्या वेळी ह.भ.प.निवृत्तीदादा बोडखे महाराज यांचे संत सावता महाराज पुण्यकाळ कीर्तन व पुष्पवृष्टी झाली. मंगळवार दि. ११ ऑगस्ट दुपारी ५ ते ६ या वेळेत दिंडी प्रदक्षिणा उत्साहात पार पडली.

### काल्याचे कीर्तन व महाप्रसाद

**सप्ताहाची सांगता बुधवार दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प.भानुदास महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. कीर्तनानंतर यशवंत धोंडे यांच्यातर्फे भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यात मृदंगाचार्य म्हणून ह.भ.प.समाधान शिंदे, उत्तम धोंडे,सुरेश डोमकावळे यांच्यासह इतर कलाकारांनी निष्काम सेवा दिली.आष्टी ते मांदळी पायी दिंडी सोमवार, दि.१७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता निघणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.**

# महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा

**परळी** | कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष मा. प्रा. प्रसाद देशमुख हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय ग्रामीण रुग्णालय परळी वै. येथील समुपदेशक शरद चव्हाण हे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉं.विद्याताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस वंदन करण्यात आले.त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी विवेकानंद कवडे यांनी प्रास्ताविकात प्रस्तुत कार्यक्रमाची पार्श्वभूमी विषद केली. प्रमुख पाहुणे समुपदेशक शरद चव्हण यांनी त्यांच्या वक्तव्यातून विद्यार्थिनींना आरोग्य विषयक माहिती दिली व एड्स विषयीचे सविस्तर मार्गदर्शन केले व क्युआर कोड बद्दल माहिती दिली. विद्यार्थीनींनी आपल्या दररोजच्या आहारात कोणत्या गोष्टी चा समावेश करावा व कोणते पदार्थ व पेय घेणे अपायकारक आहे




या वरही सविस्तर मार्गदर्शन केले. योग्य आहार व योग्य व्यायाम या गोष्टी युवकांना सदृढ बनवतात असे ते म्हणाले. त्यानंतरच्या अध्यक्षीय समारोपात प्रा. प्रसाद देशमुख यांनी विद्यार्थिनींना संबोधित करताना म्हटले की युवक म्हणजे ऊर्जा ,जिद्द व परिवर्तनाची धमक असलेला समर्थ व्यक्ती असतो .याशिवाय त्यांनी युवकांची बेरोजगारी हा चिंतेचा विषय असल्याचेही प्रतिपादन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुण चव्हाण यांनी केले तर आभार डॉ. व्ही.डी गुळभिले यांनी मानले.या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# ॲड. शिवाजी कांबळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा; मान्यवरांसह कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती



**अंबाजोगाई :** समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड. शिवाजी कांबळे यांचा वाढदिवस अंबाजोगाई येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित स्नेहमिलन सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मित्र परिवाराची मोठी उपस्थिती होती.

वाढदिवसानिमित्त ॲड. शिवाजी कांबळे यांना समाजवादी पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. तसेच अंबाजोगाईतील वकील बांधव, विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि मित्र परिवाराने दूरध्वनीद्वारेही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी ॲड. शिवाजी कांबळे यांच्या सामाजिक व राजकीय वाटचालीचे कौतुक करत आगामी काळातील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. वाढदिवसानिमित्त आयोजित स्नेहमिलनामुळे राजकीय, सामाजिक आणि कायदे क्षेत्रातील विविध मान्यवरांचा एकत्रित सहभाग पाहायला मिळाला.

# ज्ञानबोधिनी व अभिनव विद्यालयात माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी मित्र मंडळाकडून शालेय साहित्याचे वाटप

**परळी वैजनाथ: प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी मित्र मंडळाच्या वतीने एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. ज्ञानबोधिनी विद्यालयातील गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना टिफीन डबा आणि स्कूल बॅगचे मोफत वाटप करण्यात आले. त्याचबरोबर अभिनव विद्यालय येथेही शालेय साहित्य वाटप करण्यात आले.या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

अभिनव शाळेत हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मित्र मंडळाच्या या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे सामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी मोठी मदत होते आणि समाज त्यांच्या पाठीशी उभा असल्याचा विश्वास





मिळतो असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून न .प. च्या महिला व बाल विकास सभापती अंजली माळी उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि मिळालेल्या साहित्याचा योग्य वापर करून जीवनात मोठे यश संपादन करण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सचिन जोशी, जयराम गोंडे जयराज देशमुख उत्तम मोरे, संपादक अनंत कुलकर्णी, सुरेंद्र कावरे, शरद कावरे सुशिल बुदे, ओमकार कुलकर्णी, अमोल कापसे, गिरीश भोसले आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बॅग आणि टिफीन बॉक्सचे वाटप करण्यात आले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानबोधिनी विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान अभिनव विद्यालय येथेही शालेय साहित्य वाटप करण्यात आले.यावेळी शाळेचे सूर्यकांत कातकडे यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.